# विशेष खटला क्र.१२२/२०२५ मधील नि.क्र.१३ वरील आदेश

(CNR NO.MHPU14-001422-2025)

(पारीत दिनांक – २५.०२.२०२६)

१. प्रस्तुतचा अर्ज दोन्ही आरोपींनी नियमितरित्या जामीन मिळणेकरीता भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८३ अन्वये दाखल केलेला आहे.

२. आरोपींचा अर्ज व त्यावरील विद्वान सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे वाचले. उभय पक्षकारांच्या विद्वान वकिलाचे तसेच विद्वान सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे ऐकले.

३. प्रस्तुत प्रकरणातील मुळ फिर्यादी राजशेखर टोणपे हे न्यायालयात हजर आहेत. त्यांनी सदर अर्जाची प्रत पुरविण्यात यावी व त्याचा अभ्यास करण्याकरीता वेळ देण्यात यावा व त्यानंतर ते त्यांचे म्हणणे सादर करतील असे कथन केले.

४. प्रस्तुतचा अर्ज हा दि.०९.०२.२०२६ रोजी दाखल केलेला आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे सदरचा अर्ज हा तात्काळ निकाली काढणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्जाची प्रत ही फिर्यादीने स्विकारली नसल्याचे तसेच मागील तारखेस फिर्यादी यांना प्रस्तुत अर्जाची जाणीव करुन देवून सुध्दा प्रस्तुत अर्जावर त्यांनी म्हणणे दाखल केले नसल्याची नोंद नि.क्र.१३ वर दि.२३.०२.२०२६ च्या आदेशानुसार घेण्यात आली आहे. अशा परिस्थतीत, फिर्यादी यांची प्रकरण पुन्हा तहकुब करण्याची विनंती नामंजूर करण्यात येते.

५. प्रस्तुत प्रकरणात आरोपींनी त्यांचे विरुध्द दाखल केलेली केस खोटी असून आरोपींनी तपासादरम्यान तपासी अधिकारी यांना पूर्ण सहकार्य केले असल्याचे व आरोपी हे भविष्यात प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान नियमितरित्या उपस्थित राहतील असे कथन करुन जामीन देण्याची विनंती केली.

६. सदर विनंतीस विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी आक्षेप घेताना आरोपींना जामीन दिल्यास आरोपी अभियोगपक्षाच्या साक्षीदारांवर प्रभाव टाकण्याची व ते फरार होण्याची शक्यता असल्याचे नमूद केले. सबब आरोपींचा जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी केली.

७. प्रस्तुत प्रकरणातील तपास हा पूर्ण झाला असून दोषारोपपत्र दाखल झाले आहे. त्याचप्रमाणे आरोपींच्या ताब्यातून काहीएक चिजवस्तू जप्त करणे आवश्यक नसल्याचे प्रकरणाच्या स्वरुपावरुन व विद्वान सरकारी अभियोक्ता यांच्या खुलाशातून दिसून येते. अशा परिस्थितीत, आरोपींच्या कोठडीतील तपासाची आवश्यकता दिसून येत नाही. त्याचप्रमाणे **सतेंदरकुमार अंटील विरुध्द सी.बी.आय व इतर, मनू/एससी/०८५१/२०२२** या अधिनिर्णयात मा.सर्वोच्च न्यायालयाने हे स्पष्ट केले आहे की सरकारपक्षाने तपासाचे दरम्यान आरोपींना अटक केली नसल्यास तसेच आरोपींनी तपासादरम्यान तपासी अधिकारी यांना सहकार्य केले असल्यास व आरोपींच्या अटके शिवाय अथवा आरोपींच्या अटकेची गरज नाही असे स्पष्ट करुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७० अन्वये दोषारोपपत्र न्यायालयाकडे दाखल केले असल्यास आरोपींना जामीन मागण्याची देखील गरज नाही. अशा परिस्थितीत, न्यायालयाने आरोपीच्या रिमांडची गरज नसल्यास आरोपींकडून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ८८ अन्वये त्याच्या भविष्यातील हजेरीबाबत केवळ बंधपत्र घ्यावे असे निर्देशित केले आहे. ( In Satender Kumar Antil vs Central Bureau Of Investigation reported in **MANU/SC/0851/2022** Hon'ble Apex Court held that in a case where the prosecution does not require custody of the accused, there is no need for an arrest when a case is sent to the magistrate under Section 170 of the Code. There is not even a need for filing a bail application, as the accused is merely forwarded to the court for the framing of charges and issuance of process for trial. If the court is of the view that there is no need for any remand, then the court can fall back upon Section 88 of the Code and complete the formalities required to secure the presence of the accused for the commencement of the trial.)

८. प्रस्तुत प्रकरणात देखील दोन्ही आरोपींना तपासादरम्यान अटक करण्यात आलेली नाही. तसेच दोन्ही आरोपींना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम ३५(३) अन्वये नोटीस देउन तपासादरम्यान हजर राहण्याची समज देण्यात आल्याचे अभिलेखावर दिसून येते. त्याचप्रमाणे दोन्ही आरोपी हे तपासाकामी हजर राहील्याबाबत पोहोचपावती संबंधित तपास अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात हजर केली आहे. अशा परिस्थितीत, आरोपींच्या रिमांडची आवश्यकता वाटत नाही. सबब उपरोक्त नमूद मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त नमूद निर्देशाचे अनुशंगाने व उपरोक्त परिस्थितीवरुन आरोपींकडून त्यांचे भविष्यातील प्रकरणातील हजेरीबाबत केवळ जामीन बंधपत्र घेवून त्यांना जामीनावर मुक्त करणे न्यायोचित ठरेल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ व २ यांनी प्रत्येकी रक्कम ₹ १५,०००/– किंमतीचे त्यांचे वैयक्तिक जातमुचलका व बंधपत्र सादर करावेत.

२. येणेप्रमाणे जामीन अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by HETENDRA ANILKUMAR WANI
Date: 2026.02.27 10:20:50 +0530

(**हितेंद्र उर्मिला अनिलकुमार वाणी**)

दिनांक – २५.०२.२०२६

अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बारामती.